नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/02/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

# राष्ट्रीय महामार्गावर दरोडा टाकणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

## ट्रक, मारुती स्विफ्ट कार, मोबाईल फोन व रोख रक्कमेसह सुमारे ४७,५५,५००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कार्यवाही

दि. १७/०२/२०२३ रोजी मौदा हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावर माथणी टोल नाक्याजवळ एका पांढऱ्या रंगाचे स्विफ्ट कारने सहा अनोळखी इसम आले व फिर्यादी ट्रक चालक श्री किशोर गणेश मंडल व त्यांचे कंडक्टरला हातपाय बांधून ट्रकसह घेवून त्यांना एका कारमध्ये कोंबुन कन्हान परिसरातील गोंडेगांव खदान एरियात टाकुन दिले व त्यांचे जवळील ट्रक क्र. WB 25/J-5156 व त्यामधील काळया चुरीचा माल, मोबाईल फोन व नगदी रक्कम असा रु. २४,७५,५००/— चा माल लुटमार करुन पळून गेले. हया गंभीर घटनेबाबत पोलीस स्टेशन मौदा येथे ७ अनोळखी इसमांविरुध्द गुन्हे रजि. नं. ८३/२०२३ कलम ३९५ भादवि अन्वये दरोडयाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरील घटनेच्या दोन दिवसांचे अंतराने दि. १९/०२/२०२३ रोजी रामटेक हद्दीतील माहामार्गवर खिंडसी पुलाजवळ फिर्यादी ट्रक चालक श्री सतिश जनार्दन इंगोले व त्यांचे कंडक्टरला हातपाय बांधून ट्रकसह घेवून त्यांना कारमध्ये कोंबुन त्यांचे अपहरण करुन त्यांचे ताब्यातील ट्रक क्र. MH40 BL-5036 सह उर्सरा जि. भंडारा हद्दीत नेले व दोघांना जबर मारहान करुन त्यांचेजवळील ट्रक, मोबाईल फोन, नगदी रक्कम असा एकुण १०,३८,०००/— रुपयांचा मुद्देमाल लुटमार करुन नेला. याबाबत पो.स्टे. रामटेक गुन्हे रजि. नं. ६५/२०२३ कलम ३९५, ३६५ भादवि येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. या दोन्ही गुन्हयातील आरोपींनी ट्रक ड्रायव्हर व कंडक्टरचे हातपाय बांधून कारमध्ये कोंबुन नेल्याने व गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवून नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद यांनी दोन्ही गुन्हयांचा समांतर तपास कामी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे विशेष पथके तयार केले.

तपास दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे वेगवेगळे पथके वेगवेगळया दिशेने तपास करतांना वरील दोन्ही घटना ज्यादिशी घडल्या होत्या त्यादिवशी आरोपीतांनी पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कार वापरल्याची माहिती मिळून आली. तसेच पांढऱ्या रंगाच्या कारचे नंबर बनावट वापरुन वारंवार कारचे नंबर प्लेट बदलून मौदा हद्दीत फिरत असल्याची माहिती समोर आली.

दि. २२/०२/२०२३ रोजी स्थागुशा चे पथक वरील दोन्ही वाहनांचा शोध घेत असता नागपूर भंडारा महामार्गावर पांढऱ्यां रंगाची स्विफ्ट कार क्र. HR49 H 2352 हे वाहन दिसून आले. त्याचे पाठोपाठ पांढऱ्यां रंगाची स्विफ्ट कार क्र. MH 49 U 4537 हे वाहन सुध्दा दिसून आले दोन्ही वाहनांना पोलीसांनी अडविले असता वाहन चालक व वाहनात बसलेले इसम पळून जाण्याचा प्रयत्न करु लागले. परंतु पोलीसांनी त्यांना ताब्यात घेतले. सदर दोन्ही वाहनात १) सिमरजीत सिंग सरदार संतासिंग वय ४० वर्ष रा. घर क्र. ९१३, कोर्टपुरा रोड, टागोर मॉडेल स्कुल जवळ, जिल्हा मुक्तसर साहेब (पंजाब), २) नुर मोहम्मद गुल हसन वय १९ वर्ष रा. निशीरपुर तह. राणीगंज जि. प्रतापगढ (उत्तरप्रदेश) अब्दुल रहमान सहाबुद्दीन शेख, वय ३७ वर्ष रा. रुम नं. ३३ तळमजला, अनवर चाळ, क्रॉस रोड, कुटीवाही, धारावी, मुंबई आणि ४) मोहम्मद तसरीबउद्दीन वय १९ वर्ष रा. गुलरा, खानण्डापार तह. राणीगंज जि. प्रतापगढ (उत्तरप्रदेश) यांना ताब्यात घेवून वरील दोन्ही घटनेबाबत सखोल विचारपुस केली असता, सिमरजीत सिंग याने वरील दोन्ही घटना त्याने व त्याचे साथीदार १) साहील कुरैशी रा. चनईपूर तह. राणीगंज

जि. प्रतापगढ आणि २) इबरार गब्बी कुरैशी रा. भुजवा पो.स्टे. जटवारा जि. प्रतापगढ यांचे मदतीने घडवून आणल्या असल्याचे सांगीतले. वरील दोन्ही गुन्हयात चोरी केलेले ट्रक हे चंद्रपूर जिल्हयातील मुल गावी आणि उमरेड येथील मकरधोकडा येथे उभे करुन ठेवले व सदर दोन्ही ट्रक विकण्याकरीता कलकत्ता येथील व्यापाऱ्यासोबत बोलणी सुरु होती अशी माहिती मुख्य आरोपी सिमरजीत सिंग याने दिली. वरील दोन्ही ट्रक जप्त केलेले आहे. तसेच आरोपींकडून स्विफ्ट कार क्र. HR49 H 2352, कार क्र. MH 49 U 453 , एकुण ०७ मोबाईल फोन आणि रोख रक्कम ५,५००/— रुपये ०५ नग बनावट चाव्या, २ लोखंडी टॉमी (रॉड) असा माल व जप्त ट्रक **एकुण ४७,५५,५००/— रुपयांचा** मुद्देमाल हस्तगत केला आहे. अधिक तपास केला असता सदरची कार क्र. MH 49 U 453 ही जळगांव MIDC एरियामधून आरोपीतांनी चोरी केल्याचे सांगीतले. सदर वाहनाचा मुळ नंबर MH 19 CU 0358 असा असल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबत पोलीस स्टेशन MIDC जळगांव येथे गुन्हा नोंद आहे.

सदर अपराध्यांची टोळीने नागपूर ग्रामीण जिल्हया व्यतिरीक्त जळगांव जिल्हयातुन चारचाकी वाहन चोरी केल्याचे समोर आले आहे. सदरची टोळीमध्ये मुंबई, पंजाब उत्तरप्रदेश राज्यातील गुन्हेगारांचा समावेश असल्याने आंतरराज्यीय सक्रिय टोळीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. सदर टोळीचा इतर ४ ते ५ ठिकाणी गुन्हे करण्याचा कट होता असे आरोपीतांनी सांगीतले व जळगाव मधून चोरुन आणलेल्या गाडीचा चोरीच्या घटनेमध्ये उपयोग करणार होते तत्पुर्वीच स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पथकाने त्यांना जेरबंद केले. वरील आरोपी व गुन्हयात जप्त केलेला मुद्देमाल पो.स्टे. मौदा यांचे ताब्यात देण्यात आला असून पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरीक्षक, राजीव कर्मलवार, अनिल राऊत, आशिषसिंग ठाकूर, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर राऊत, विनोद काळे, गजेन्द्र चौधरी, इकबाल शेख, राजेन्द्र रेवतकर, रोशन काळे, पोलीस नायक रोहन डाखोरे, अमृत किनगे, विपीन गायधने, बालाजी साखरे, आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, अभिषेक देशमुख सायबर सेलचे नायक सतिष राठोड, आणि चालक पोलीस हवालदार अमोल कुथे, पोलीस शिपाई मुकेश शुक्ला, आशुतोष लांजेवार, सुमीत बांगडे यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर